# क्वीन मेरी स्कूलचा उपक्रम




**क्वीन मेरी** स्कूलच्या विद्यार्थ्यांनी टाटा पॉवरच्या सहकार्याने 'चेशायर होम' या संस्थेमध्ये अपंग विद्यार्थ्यांकरिता आपत्ती व्यवस्थापन या विषयावर जनजागृतीपर कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या वेळी आग लागल्यास, रस्ता अपघात झाल्यास किंवा नैसर्गिक आपत्तीचा सामना कसा करावा याचे प्रशिक्षण देण्यात आले. तसेच या विद्यार्थ्यांना विविध कल्पक, नावीन्यपूर्ण तंत्र वापरून, बोलणाऱ्या बाहुल्यांच्या मदतीने हे समजावून सांगण्यात आले. यात शाळेच्या ३५ विद्यार्थ्यांनी टाटा क्लब एनर्जीच्या १५ स्वयंसेवकांसह भाग घेतला होता. या वेळी टाटा पॉवरचे कार्यकारी संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल सरदाना उपस्थित होते.